अतितात्काळ/महत्वाचे/कालमर्यादा

क्र.पोमसं/५/१०/पोउनि-मविस्पप-२०२१/११/२०२२

पोलीस महासंचालक यांचेकार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- १७.०६.२०२२

विषय :- पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२१

*****

परिपत्रक :-

सोबत शासन पत्र क्रमांक पोलीस १८२०/प्र.क्र. १३५/पोल-५ अ, दिनांक १५.०६.२०२२ चे व त्यासोबतचे महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्रमांक एलटीडी-३४१७/सी.आर.१४/२०१७/जाहिरात, दिनांक १०.०६.२०२२ आणि शासन परिपत्रक क्र. पोलीस १८२०/प्र.क्र. १३५/पोल-५अ, दिनांक १५.०६.२०२२ जोडले आहे.

तरी खालील नमूद घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा - २०२१ बाबतची माहिती त्यांच्या अधिपत्याखालील मुख्य परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांना (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असणा-या कर्मचा-यांसह) दयावी. ही माहिती www.mahapolice.gov.in (महाराष्ट्र पोलीस विभागाचे संकेतस्थळ) वर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

Gautam

(लखमी गौतम)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह अग्रेषित).
महासंचालक, गृह रक्षक दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह अग्रेषित).
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / नक्षलविरोधी अभियान, नागपूर / प्रशिक्षण व खास पथके, मुंबई / राज्य राखीव पोलीस बल, मुंबई / वाहतूक, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, मुंबई / दहशतवाद विरोधी पथक, मुंबई / लोहमार्ग / फोर्स वन, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक .
विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, पुणे / मोटार परिवहन, पुणे / विशेष कृती दल, नागपूर / राज्य राखीव पोलीस बल, पुणे / राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / विशेष सुरक्षा विभाग, मुंबई /
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (मोटार परिवहन विभाग/ बिनतारी संदेश विभाग/ लोहमार्ग/ कारागृह सह).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १६.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

प्रत सादर अग्रेषित,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

प्रत,

प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, मुंबई.

२/- यांनी सदरचे परिपत्रक www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन, दि.३१.०८.२०२२ पर्यंत ठेवावे.

प्रत सादर अग्रेषित,

पोलीस महासंचालक यांचे स्वियसहायक

महाराष्ट्र शासन
गृह विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

Email ID : home_pol5a@maharashtra.gov.in    दूरध्वनी क्र - २२८१८४०७

---

क्रमांक : पोलीस १८२०/प्र.क्र.१३५/पोल ५अ    दि. १५ जून, २०२२

प्रति,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय :- पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा-२०२१.**
संदर्भ : - १) सह सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे पत्र क्र.एलटीडी-३४१७/सीआर-१४/२०१७/जाहिरात, दि.१०/०६/२०२२.
२) शासन परिपत्रक समक्रमांक, दि.१५/०६/२०२२.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी **"पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा २०२१"** घेण्यात आली असून सदर पूर्व परिक्षेचा निकाल ०९ जून २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. प्रस्तूत पूर्व परिक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा-२०२१ शनिवार, दिनांक ३० जुलै,२०२२ रोजी घेण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. प्रस्तुत परीक्षेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे विहीत केला आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | शासन परिपत्रक निर्गमित करण्याचा दिनांक | दिनांक १५ जून, २०२२ |
| २ | ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज स्वीकृतीचा कालावधी | दिनांक १५ जून, २०२२ रोजी १४.०० वाजल्यापासून ते दिनांक २९ जून, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०१ जुलै, २०२२ |
| ४ | बँकेत चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०२ जुलै, २०२२ बँकेच्या कार्यालयीन वेळेत |
| ५ | सेवा कालावधी गणना करण्याचा दिनांक | दिनांक ०१ जानेवारी, २०२२ |
| ६ | परीक्षेचा दिनांक व वार | शनिवार, दिनांक ३०जुलै, २०२२ |

२.	विषयाधीन परीक्षेसंदर्भातील परीक्षेचा कार्यक्रम, निवडपध्दतीचा तपशील, मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम इत्यादींच्या तपशिलासंदर्भातील शासन परिपत्रक दि.१५/०६/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. (प्रत सोबत जोडली आहे) सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून त्याची माहिती बिनतारी संदेशाद्वारे पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

३.	प्रस्तुत विभागीय परीक्षेकरिता उमेदवारांनी ऑनलाईनप्रक्रियेद्वारे अर्ज सादर करावयाचे असून पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी "विवरणपत्र -२" मधील विहित नमून्यात सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आयोगास अर्ज सादर केल्याचे आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळविणे आवश्यक असून उमेदवाराचा अर्ज विचारात घेण्यास विभाग/कार्यालय प्रमुखांचा कोणताही आक्षेप असल्यास तसे विभाग/कार्यालय प्रमुखांनी **दिनांक २९ जून,२०२२ पर्यंत** आयोगास कळविणे आवश्यक आहे. मात्र अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही, ही बाब सर्व संबंधितांच्या कृपया निदर्शनास आणण्यात यावी. मुख्य परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना परीक्षेची माहिती शासन परिपत्रकाद्वारे ज्ञात होण्याची कृपया खबरदारी घ्यावी. जेणे करुन कोणताही उमेदवार परीक्षेपासून वंचित राहणार नाही. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

१५.६.२०२२

(गणेश गायकवाड)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

सहपत्र- वरीलप्रमाणे

प्रत,

१)अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),महाराष्ट्र राज्य,मुंबई
२)अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य,मुंबई
३)निवडनस्ती (पोल-५ अ)

महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

क्रमांक : एलटीडी-३४१७/सीआर-१४/२०१७/जाहिरात

तात्काळ / हस्तांतरणाने

दिनांक :- १० जून, २०२२.

प्रति,

अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा),
महाराष्ट्र शासन,
गृह विभाग (पोल ५-अ)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२.

**विषय :-** पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा -२०२१ शासन परिपत्रक निर्गमित करण्याबाबत.

**संदर्भ :-** शासन परिपत्रक, गृह विभाग, क्रमांक : पोलीस-१८२०/प्र.क्र.१३५/पोल-५-अ, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधीन शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने आयोगामार्फत दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा-२०२१ चा निकाल दिनांक ०९ जून, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा-२०२१ शनिवार, दिनांक ३० जुलै, २०२२ रोजी घेण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत परीक्षेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे विहित केला आहे :-

| | |
|---|---|
| शासन परिपत्रक निर्गमित करण्याचा दिनांक | दिनांक १५ जून, २०२२ |
| ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज स्वीकृतीचा कालावधी | दिनांक १५ जून, २०२२ रोजी १४.०० वाजल्यापासून ते दिनांक २९ जून, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०१ जुलै, २०२२ |
| बँकेत चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०२ जुलै, २०२२ बँकेच्या कार्यालयीन वेळेत |
| सेवा कालावधी गणना करण्याचा दिनांक | दिनांक ०१ जानेवारी, २०२२ |
| परीक्षेचा दिनांक व वार | शनिवार, दिनांक ३० जुलै, २०२२ |

३. उपरोक्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा २०२१ करिता जारी करावयाच्या प्रारुप शासन परिपत्रकाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. प्रस्तुत प्रारुप परिपत्रकास शासनाची मंजुरी घेऊन ते विहित दिनांकास प्रसिध्द करण्याची कृपया व्यवस्था करावी.

४. प्रस्तुत विभागीय परीक्षेकरिता उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज सादर करावयाचे असून, पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी सोबतच्या **"विवरणपत्र-२"** मधील विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. त्याची प्रत देखिल पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. उमेदवाराने आयोगास अर्ज सादर केल्याचे आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांना कळविणे आवश्यक असून, उमेदवाराचा अर्ज विचारात घेण्यास विभाग/कार्यालय प्रमुखांचा कोणताही आक्षेप असल्यास तसे विभाग/कार्यालय प्रमुखांनी **दिनांक २९ जून, २०२२** पर्यंत आयोगास कळविणे आवश्यक आहे. मात्र अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही. ही बाब सर्व संबंधितांच्या कृपया निदर्शनास आणण्यात यावी.

५. मुख्य परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना परीक्षेची माहिती शासन परिपत्रकाद्वारे ज्ञात होण्याची कृपया पूर्णतः खबरदारी घ्यावी. जेणे करुन कोणताही उमेदवार परीक्षेपासून वंचित राहणार नाही. याकरिता सदर परिपत्रक शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(सु.ह.अवताडे)
सह सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांच्याकरीता पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्तीसाठी पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा- २०२१.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः पोलीस १८२०/प्र.क्र.१३५/पोल- ५ अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: १५ जून, २०२२

**शासन परिपत्रक :**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील एकूण **२५०** पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **शनिवार, दिनांक ३० जुलै,२०२२** रोजी **पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा- २०२१** मुंबईसह महाराष्ट्रातील ६ जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल:-

२. **संवर्ग/ पदाबाबत सर्वसाधारण तपशील** :-

**२.१ संवर्ग :- पोलीस उपनिरीक्षक, अराजपत्रित, गट-ब**

**२.२ वेतनश्रेणी :-** रुपये S-१४ : ३८६००-१२२८०० **अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते**.

**२.३ पदसंख्या** :- २५०

**२.४ मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक** २७९७/२०१५ **प्रकरणी दिनांक** ०४ **ऑगस्ट**, २०१७ **रोजी दिलेल्या निकालाच्याआधारे सदर पदे प्रवर्गनिहाय आरक्षणानुसार न भरता गुणवत्तेनुसार भरण्यात येतील**.

३. **पात्रता :-**

**३.१ अर्हता :-**

**३.१.१** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अखत्यारीतील सध्या कार्यरत सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई या संवर्गातील कर्मचारीच प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील.

**३.१.२ शैक्षणिक अर्हतेसह सेवा:-**

(**एक**) सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई या पदावर नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून **दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी** खालीलप्रमाणे किमान नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे:-

(१) मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा **पदवीधर** असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत - **४ वर्षे नियमित सेवा.**

(२) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची **एच.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण** किंवा महाराष्ट्र शासनाने एच.एस.सी. च्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता, अशा उमेदवारांच्या बाबतीत - **५ वर्षे नियमित सेवा.**

(३) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची **एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण** किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी.च्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता, अशा उमेदवारांच्या बाबतीत - **६ वर्षे नियमित सेवा.**

**(दोन)** नियमित सेवेचा कालावधी खालीलप्रमाणे गणण्यांत येईल :-

(१) नामनिर्देशनाने नेमणूक झालेल्या कर्मचा-यांच्या नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून

(२) अनुकंपा तत्वावर नेमणूक झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून

(३) अन्य कारणास्तव सेवा नियमित झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्या सेवा नियमित केल्या संबंधीच्या शासन आदेशाच्या दिनांकापासून.

(४) पदोन्नत कर्मचा-याच्या नियमित पदोन्नतीच्या दिनांकापासून

**३.२ वयोमर्यादा:-**

(१) अमागास उमेदवार- कमाल वयोमर्यादा-३५ वर्षे

(२) मागासवर्गीय उमेदवार- कमाल वयोमर्यादा-४० वर्षे

(३) **दिनांक ०१ जानेवारी २०२२** रोजी वयाची गणना केली जाईल.

(४) पोलीस उप निरीक्षक, (सेवाप्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम, २००८ नुसार एखाद्या वर्षी परीक्षा न झाल्यामुळे कमाल वयोमर्यादा पूर्ण होण्यापूर्वी परीक्षेच्या सलग तीन संधी मिळाल्या नसतील अशा उमेदवारांना कमाल वयोमर्यादेनंतर सलग होणा-या परीक्षेस बसण्याच्या उर्वरित संधी देण्यात येतील. तथापि, कोणत्याही परिस्थितीत या सलग संधी तीन पेक्षा जास्त असणार नाहीत.

(५) कमाल वयोमर्यादा पूर्ण होण्यापूर्वी परीक्षेच्या सलग तीन संधी मिळूनही उमेदवाराने एखाद्या परीक्षेसाठी अर्ज केलेला नसेल तर संबंधित उमेदवाराने सदर परीक्षेची संधी घेतली असे मानण्यात येईल.

(६) सेवाप्रवेश नियमातील कमाल वयोमर्यादा पूर्ण होण्यापूर्वी अर्ज करणा-या उमेदवारांना परीक्षेच्या कमाल संधी बाबत कोणतीही मर्यादा लागू नाही.

(७) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**३.३** शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक पोलीस-१८२१/प्र.क्र.५२/पोल-५अ, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२१ अनुसार दिव्यांग उमेदवार सदर पदाकरीता पात्र नाहीत.

**४. निवडप्रकिया** :-

४.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखत/शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

४.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम १९९५ अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल.

**५. परीक्षेचे टप्पे:-**

५.१ प्रस्तुत परीक्षा खालील टप्प्यांमध्ये घेण्यात येईल :-

(१) मुख्य परीक्षा - ३०० गुण

(२) शारीरिक चाचणी - १०० गुण

**५.२ मुख्य परीक्षा :-**

**(१) प्रश्नपत्रिका :- एक.** प्रश्नपत्रिकेचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| संकेतांक क्रमांक | विषय | माध्यम | प्रश्नसंख्या व गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| २०१ | विधी (प्रमुख कायदे व इतर कायदे) | इंग्रजी व मराठी | १५०/३०० | दीड तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**(दोन) अभ्यासक्रम :-**

(१) परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील "**उमेदवारांना सूचना**" अंतर्गत "**अभ्यासक्रम** " या सदराखाली उपलब्ध आहे.

(२) मुख्य परीक्षेची परीक्षा योजना व अभ्यासक्रम सोबतच्या विवरणपत्र - १ प्रमाणे राहील.

**५.३ मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**(एक)** पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे पात्र उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**(दोन)** मुख्य परीक्षेकरीता शासनाकडून परिपत्रक प्रसिध्द झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य लेखी परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या –कार्यपद्धतीनुसार परीक्षा केंद्र निवडून परीक्षा शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य लेखी परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**(तीन)** पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना आयोगाकडे सादर केलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

**६. परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

**६.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**(एक)** आवश्यक असल्यास शैक्षणिक अर्हतेबाबत खाते अद्ययावत करणे. पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये नमूद शैक्षणिक अर्हतेव्यतिरिक्त इतर कोणत्याही माहिती / दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**(दोन)** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

**(तीन)** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**(चार)** जिल्हा केंद्र निवड करणे.

**६.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**(एक)** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/ प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ७ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | अराखीव माहिला, खेळाडू, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १२ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |

**(दोन)** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील “उमेदवारांना सर्वसाधारण सूचना” प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**(तीन)** उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना शैक्षणिक अर्हतेसह अनुभवासंदर्भात सोबतच्या विवरणपत्र - २ मधील विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे.

**(चार)** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**(पाच)** शारीरिक चाचणी/प्रमाणपत्र तपासणीकरीता आमंत्रित केल्यानंतर पात्रतेसंदर्भातील सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**(सहा)** पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे तपासणीच्या वेळी सादर न केल्यास शारिरीक चाचणी अथवा शिफारशीसाठी विचार करण्यात येणार नाही.

**६.३ सर्वसाधारण :-**

(एक) अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

(दोन) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

(तीन)अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(चार) आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**६.४ अर्ज सादर करण्याचा कालावधी:-दिनांक १५ जून, २०२२ रोजी १४.०० वाजल्यापासून दिनांक २९ जून, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६.५ जिल्हा केंद्र निवड :-**

**६.५.१ मुख्य परीक्षा खालील सहा जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल :-**

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| अमरावती | **१४** |
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| नाशिक | **३५** |
| पुणे | **३८** |

**६.५.२** अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**६.५.३** जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.६ शुल्क (रुपये) :-**

**(एक)** अमागास - **रु. ८४४/-**

**(दोन)** मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ - **रु. ५४४/-**

**(तीन)** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**(चार)** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**६.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

**६.७.१** अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या “Submit and Pay fees” या बटनावर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या यादीतील “Fees not Paid” अशी सद्यस्थिती **लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील** ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

६.७.२ परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) **ऑनलाईन पध्दतीने :-**

(१) भारतीय स्टेट बँक तसेच क्विकवॉलेट यापैकी कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे **परीक्षा शुल्क अदा करता येईल**.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व **बँकेकडून व्यवहार** (Transaction) **पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे**.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(दोन) **ऑफलाईन पध्दतीने :-**चलनाद्वारे

(१) चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. **कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही**.

(३) विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

(४) परीक्षा शुल्काचा भरणा करण्यासंदर्भातील कार्यवाही खालील विहित दिनांकापूर्वी पूर्ण करावी:-

(एक) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम **दिनांक २९ जून, २०२२ रोजी २३:५९ वाजेपर्यंत.**

(दोन) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम **दिनांक ०१ जुलै, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत**.

(तीन) चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम **दिनांक ०२ जुलै, २०२२** – बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

६.८ ऑनलाईन पध्दतीने आयोगास सादर केलेल्या अर्जाच्या प्रतीसह अर्ज केल्याबाबतची माहिती उमेदवारांनी स्वत: आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळविणे आवश्यक आहे.

६.९ प्रस्तुत परीक्षेचा अर्ज विचारात घेण्यास विभाग/कार्यालय प्रमुखांना कोणताही आक्षेप असल्यास तसे विभाग/कार्यालय प्रमुखांनी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत आयोगास कळविणे आवश्यक आहे. तसेच परीक्षेकरीता अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही; असेही उमेदवारांनी संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावे.

६.१० परीक्षेस अर्ज सादर केल्यानंतर अथवा परीक्षा दिल्यानंतर उमेदवाराने राजीनामा दिल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव नोकरी सोडल्यास अथवा विभागाने सेवा समाप्त केल्यास अथवा धारणाधिकार न ठेवता संवर्गबाह्य पदावर नेमणूक झाल्यास सदर परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

६.११ "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०२१" तसेच तद्नंतर यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार नियुक्ती विषयक कार्यवाही करण्यात येईल.

७. अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे उमेदवार परिपत्रकातील विहित अर्हतेबाबतच्या अटींची व शर्तींची पुर्तता करतात असे समजून पात्रता न तपासता आयोगाकडून उमेदवारांना तात्पुरता प्रवेश दिला जाईल. परंतु परीक्षेपूर्वी अथवा परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर, उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची वा खोटी असल्याचे अथवा उमेदवार विहित अर्हतेची पुर्तता करीत नसल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल तसेच संबंधित उमेदवाराची कृती ही आयोगाची फसवणूक समजून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याव्यतिरिक्त आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार संबंधित उमेदवाराला प्रतिरोधित (Debar) करण्याची कारवाई करण्यात येईल आणि त्याबाबतचा आयोगाचा निर्णय अंतिम राहिल.

**८. शारीरिक चाचणीबाबत :-**

८.१ मुख्य लेखी परीक्षेच्या निकालाआधारे शारीरिक चाचणीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना शारीरिक चाचणी द्यावी लागते हे विचारात घेऊन उमेदवारांनी वेळीच त्यासाठी सराव व पूर्वतयारी करावी. मुख्य लेखी परीक्षेच्या निकालानंतर सर्वसाधारणपणे दोन आठवड्याच्या अंतराने कधीही शारीरिक चाचणी आयोजित केली जाईल. सरावासाठी पुरेसा वेळ मिळाला नसल्याच्या कारणास्तव शारीरिक चाचणीचे दिनांक बदलून मागता येणार नाहीत किंवा त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

८.२ आयोगाकडून शारीरिक चाचणीचा कार्यक्रम निश्चित होताच तो आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीतील संबंधित पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

८.३ आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी संबंधित उमेदवाराने शारीरिक चाचणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. शारीरिक चाचणीसाठी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेमध्ये बदल करण्याबाबतची विनंती मान्य केली जाणार नाही व त्यामुळे उमेदवाराची शारीरिक चाचणीची संधी वाया गेल्यास त्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल.

८.४ केवळ शारीरिक चाचणीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून वैद्यकीय कारणास्तव शारीरिक चाचणीचा दिनांक बदलून देण्याची विनंती करणा-या उमेदवारांना वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या आजार/दुखापत, त्याचे स्वरुप, गांभीर्य व सत्यता तपासणीसाठी लगेचच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस सक्षम वैद्यकीय मंडळापुढे पाठविण्यात येईल.तसेच वैद्यकीय मंडळाने फिटनेस (Fitness) प्रमाणपत्र प्रदान केले तरच त्यांना आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस शारीरिक चाचणीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल.

८.५ वैद्यकीय कारणास्तव शारीरिक चाचणीसाठी मुदतवाढ मागणा-या उमेदवारांच्या बाबतीत सत्यता तपासणीनंतर वैद्यकीय मंडळाकडून प्रतिकूल अहवाल प्राप्त झाल्यास संबंधित उमेदवाराला शारीरिक चाचणीची संधी नाकारण्यात येईल. तसेच, अशा प्रकरणी आयोगाची फसवणूक करण्याचा प्रयत्न समजून संबंधित उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. शिवाय उमेदवाराची संबंधित परीक्षेची उमेदवारी रद्द करण्यात येऊन आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीपासून उमेदवाराला प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त संबंधित उमेदवारांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

८.६ अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत तसेच समर्थनीय कारणासह अर्ज केलेल्या उमेदवारांना शारीरिक चाचणीचा दिनांक व वेळ बदलून देण्याच्या विनंतीबाबत आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार, विचार करण्यात येईल. एखाद्या प्रकरणी आयोगाने विनंती अमान्य केली असेल तर संबंधित उमेदवाराला पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसार शारीरिक चाचणीसाठी उपस्थित रहावे लागेल. तद्नंतर उमेदवाराला पुढील संधी दिली जाणार नाही.

**९. प्रवेशप्रमाणपत्र :-**

९.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९.३ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

९.४ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

९.५ परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

९.६ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

९.७ नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०. परीक्षेस प्रवेश** :-

**परीक्षेच्या प्रवेश/उपस्थितीसंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळाद्वारे अथवा प्रवेशप्रमाणपत्राद्वारे देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून आयोगाच्या स्वेच्छाधिकानुसार कारवाई करण्यात येईल.**

**११.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील **" उमेदवारांकरीता माहिती "** विभागातील **" सूचना "** अंतर्गत **" सर्वसाधारण सूचना "** तसेच **" परीक्षा " या सदराखालील " परीक्षा योजना "** विभागातील **" पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा "** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

**१२.** आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१३.** प्रस्तुत परिपत्रक आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१४.** सदर परिपत्रक रजेवर/प्रतिनियुक्तीवर असणा-या कर्मचा-यांसह सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

**१५.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२०६१५११२५३७२०२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL EKNATH
KULKARNI

Digitally signed by ANIL EKNATH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=a68ace8f470aec5d6a18e832ae4a8b4d7804aba280ecdb8c3db114bd3cb1c2ac, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=04A7B4319163F6C965DD5CCDF92A74288C731F37328C1327B237008EB8DDC2D4, cn=ANIL EKNATH KULKARNI
Date: 2022.06.15 11:29:57 +05'30'

**( अ. ए. कुलकर्णी )**

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, (पत्राने)

## विवरणपत्र-१

## पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षेची परीक्षा योजना व अभ्यासक्रम

### -: परीक्षा योजना :-

| विषय (संकेतांक क्रमांक - २०१) | माध्यम | प्रश्नसंख्या व गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| विधी (प्रमुख कायदे व इतर कायदे) | इंग्रजी व मराठी | १५०/३०० | दीड तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

### -: अभ्यासक्रम :-

**Law (Major Acts)**

| **Topics** | | **No. of Questions** | **Marks** |
|---|---|---|---|
| **1) Constitution of India** | | **15** | **30** |
| **2) Indian Penal Code, 1860 (30 Questions 60 Marks)** | | | |
| **Chapters with their Nos.** | **Sections** | | |
| (II) General Explanation | 10, 11, 14, 21, 22, 23, 24, 25, 26, 28, 29, 29-A, 30, 34, 39, 40, 44, 52. | **10** | **20** |
| (III) Punishments | 75. | | |
| (IV) General Exceptions | 76, 79 to 86, 90, 94 to 106. | | |
| (V) Abetment | 107 to 109, 114, 115, 116. | | |
| (VA) Criminal Conspiracy | 120-A, 120-B. | | |
| (VIII) Offences against the Public Tranquillity | 141 to 149, 159, 160. | | |
| (IX) Offences by or relating to Public Servants. | 167, 170, 171. | **10** | **20** |
| (X) Contempts of the Lawful Authority of Public Servants | 177, 179, 180, 182, 186, 187, 188. | | |
| (XI) False Evidence & Offences against Public Justice | 191, 193, 201, 211, 224, 225. | | |
| (XII) Offences relating to Coin & Government Stamps. | 231, 233. | | |
| (XIV) Offences affecting the Public Health, Safety, Convenience, Decency & Morals. | 279, 293, 294. | | |
| (XV) Offences relating to religion. | 295, 295-A, 298. | | |
| (XVI) Offences Affecting the Human Body. | 299 to 302, 304, 304-A, 304-B, 306, 307, 309, 317 to 320, 323 to 326, 326A, 326B, 330, 332, 336 to 343, 348 to 354, 354A, 354B, 354C, 354D, 359 to 364, 366, 366-A, 375, 376, 376 (A),(B),(C), (D) & (E), 377. | **10** | **20** |
| (XVII) Offences against Property | 378 to 383, 390 to 395, 396, 399, 403, 404 to 412, 414 to 417, 419, 420, 425, 429 to 432, 436, 441 to 448, 451, 453, 457, 458, 461. | | |
| (XVIII) Offences relating to documents & to property marks. | 463, 471, 477-A. | | |
| (XX) Offences relating to Marriage. | 494, 497, 498. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (XX-A) Cruetly by husband or his relatives. | 498-A. | | |
| (XXII) Criminal Intimidation, Insult & Annoyance. | 504, 506, 509. | | |
| (XXIII) Attempts to commit offences | 511. | | |

| **3) Code of Criminal Procedure, 1973 (20 Questions 40 Marks)** | | | |
|---|---|---|---|
| **Chapters with their Numbers** | **Sections** | | |
| (I) Preliminary | 2. | **5** | **10** |
| (II) Constitution of Criminal Courts & offices | 6 to 21. | | |
| (IV) (A) Powers of Superior Officers of Police | 36. | | |
| (V) Arrest of Persons | 41, 41A, 41B, 41C, 41D, 42, 46, 47, 50, 50A, 51 to 54, 53A, 54A, 55A, 57, 58, 60A. | | |
| (VI) Process to compel appearance | 61 to 90. | **5** | **10** |
| (VII) Processes to compel the production of things. | 91 to 102. | | |
| (VIII) Security for keeping the peace & for good behaviour. | 107, 109 & 110. | **10** | **20** |
| (X) Maintenance of Public Order & Tranquillity | 129, 144, 145. | | |
| (XI) Preventive action of the Police. | 149 to 153. | | |
| (XII) Information to the Police & their Powers to investigate. | 154 to 176. | | |
| (XIV) Conditions requisite for initiation of proceedings. | 196, 197. | | |
| (XXVII) The Judgement. | 357-A, 357-B, 357-C. | | |
| (XXXIII) Provisions as to bail and bonds. | 436, 437, 438. | | |
| **4) Indian Evidence Act, 1872** | | | |
| **Chapters with their Nos.** | **Sections** | **10** | 20 |
| (I) Preliminary | 1 to 4. | | |
| (II) The Relavancy of facts | 8, 9, 24 to 32 (1), 45, 47, 53, 54. | | |
| (IV) Oral Evidence | 59, 60. | | |
| (V) Documentary Evidence | 61 to 63, 74 to 76. | | |
| (VII) The Burden of Proof | 101, 113-A, 113-B. 114-A | | |
| (IX) Witnesses | 125. | | |
| (X) Examination of Witnesses | 146. | | |

## Law (Minor Acts & Other Acts)

| **(A)** | **Minor Acts (40 Questions 80 Marks)** | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr.No** | **Name of Act** | **Sections** | **No. of Quest.** | **Marks** |
| 1 | The Maharashtra Police Act, 1951 | 2(3), (5A), (9), (10), (11), (13), 14, 28, 33, 36 to 38, 41, 55 to57, 62, 63-A, 64 to73, 79 to 82, 99, 108, 110, 112, 115 to 124, 126, 130A, 131, 134, 136, 137, 140, 141 to 143, 143-A, 145, 147, 148, 151, 159 to 161, 163. | **5** | **10** |
| 2 | The Maharashtra Prohibition Act, 1949 | 2(2), (7), (8), (10), (10-A), (22), (23), (24), (30), 11 to 24-A, 65 to 68, 83 to 86, 89, 119, 123, 126, 127. | **2** | **4** |
| 3 | The Maharashtra Prevention of Gambling Act, 1887 | 3 to 7, 12 (a) | **2** | **4** |
| 4 | The Protection of Civil Rights Act, 1955 including untouchability. | 2 to 4, 7, 10, 14-A. | **2** | **4** |
| 5 | The Arms Act, 1959. | 1 to 3, 4, 5, 20, 25, 25(a), 29, 39. | **2** | **4** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | The Motor Vehicles Act, 1988. | 2(28), 2(34), 2(40), 2(47), 3, 4, 5, 119, 133, 134,177, 179, 182, 183, 184, 185, 186, 187, 189, 190, 192, 192-A, 194, 196, 197, 198, 202, 206, 207, 209. | **3** | **6** |
| 7 | The Maharashtra Motor Vehicles Rules, 1989 | 20, 23, 52, 95, 102, 103, 117, 222, 237(1). | | |
| 8 | The Mental Health Act, 1987 | 2(L)/(M)/(S), 23, 25, 28, 36, 48, 81. | **1** | **2** |
| 9 | Representation of People Act, 1951 | 125, 126, 127(1), 127(2) (3), 127(A), 129, 130(1) (2), 131, 132, 133, 135(1), 135(A), 136(B) (C). | **1** | **2** |
| 10 | Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2000. | All. | **3** | **6** |
| 11 | Prevention of Corruption Act, 1988. | 2, 7, 11, 12, 13, 17. | **2** | **4** |
| 12 | The Scheduled Castes & Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989 | 3, 4. | **2** | **4** |
| 13 | The N.D.P.S. Act, 1985. | 2, 8, 14, 18, 20, 36-A, 41 to 44, 49 to 51. | **2** | **4** |
| 14 | Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers & Drug Offenders Act, 1981 | Object of the Act, 2, 3, 8, 13. | **2** | **4** |
| 15 | Maharashtra State Control of Organised Crime Act, 1999 | Object of the Act, 2, 3, 4, 14, 16, 18, 23, 24. | **2** | **4** |
| 16 | Maharashtra Protection of Interests of Depositors. (Into Financial Establishments) Act, 1999. | Object of the Act, 2, 3, 4. | **2** | **4** |
| 17 | Information Technology Act, 2000 (Cyber law) | Object of the Act, 2, 3, 43, 65 to 67, 78, 80, 85. | **3** | **6** |
| 18 | Protection of Children from Sexual Offences Act, 2012. | All. | **2** | **4** |
| 19 | Pre- Conception & Pre-Natal Diagnostic Techniques Act (PCPNDT Act), 1994 | All. | **2** | **4** |

| | | | |
|---|---|---|---|
| **(B)** | **Crime Investigation (10 Questions 20 Marks)** | | |
| **(1)** | Crime Investigation (Practical approach) | **8** | **16** |
| | (a) Crime Scene Panchnama, | | |
| | (b) Arrest Panchnama, | | |
| | (c) Seizure Search Panchnama, | | |
| | (d) Inquest Panchnama, | | |
| | (e) Memorandum Panchnama u/s 27 of IEA. | | |
| **( 2)** | Proposals of externment proceedings & Chapter proceedings. | **2** | **4** |
| **(C)** | **Scientific Aids to Crime Investigation** | | |
| | गुन्हे अन्वेषणासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या वैज्ञानिक पध्दती/साधने (Scientific Aids to Crime Investigation):- संगणक तसेच अन्य आधुनिक साधनांच्या विशेष अभ्यासासह. | **5** | **10** |
| **(D)** | **Forensic Science :-** | **5** | **10** |
| | (i) *Physical evidence* :- nature, search, handling, packing and forwarding. | | |
| | (ii) *Finger_prints & Foot prints* :- Importance, finding them on the scene of crime, their development and recording. | | |
| | (iii) *Explosives*:- Its names, commonly used explosives, home bombs, Handling and collection of explosive residues and their examination. | | |
| **(E)** | **Forensic Medicines** : | **10** | **20** |
| | (i) *Introduction*:- Scope & importance to police. Examination of scene of occurrence from the point of view of medico-legal evidence. | | |
| | (ii) Medico Legal definition of death, difference between dead & alive persons. | | |
| | (iii) Identity of dead persons, Post Mortem. | | |
| | (iv) *Violent Asphyxial death* - hanging, suffocation & drowning. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (v) Medico legal aspects of different types of wounds, by fire-arms, sharp edged or pointed weapons.<br>(vi) *Sexual offences* - rape.<br>(vii) Poison commonly used in India in the commission of crime. | | |
| **(F)** | **Human Rights** – (i) Its awareness, Principles of handcuffing as per directions of the Supreme court.<br>(ii) National Human Rights Commission.<br>(iii) State Human Rights Commission.<br>(iv) State Police Complaints Authority. | **5** | **10** |

# विवरणपत्र-२

## पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेकरीता आस्थापना अधिकारी किंवा कार्यालय/विभागप्रमुख यांनी द्यावयाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, खाली नमूद उमेदवारांसदर्भात अर्जामध्ये दिलेली नियमित नियुक्तीसंबंधीची माहिती व खाली नमूद केलेली माहिती कार्यालयातील नोंदीवरुन तपासण्यात आली :- (खालीलपैकी लागू असलेल्या चौकटीत √ अशी खूण करावी)

१. उमेदवाराचे संपूर्ण नाव :- ____________________

२. उमेदवाराचा जन्मदिनांक :- | D | D | | M | M | | Y | Y | Y | Y |

३. शैक्षणिक अर्हता :- ____________________
(एस.एस.सी. पासून पुढे)

४. नियुक्तीचे पद व नियुक्तीचा दिनांक :- ____________________ | D | D | | M | M | | Y | Y | Y | Y |
(पदाचे नाव)

५. सध्याच्या कार्यरत नियमित पदावरील नियुक्तीचा मार्ग :- | नामनिर्देशन | पदोन्नती | अनुकंपा | अन्य |

६. पोलीस कॉन्स्टेबल पदावरील नियुक्तीचा दिनांक :- | D | D | | M | M | | Y | Y | Y | Y |

७. शासन परिपत्रकानुसार पोलीस कॉन्सटेबल पदावर झालेली एकूण नियमित सेवा :- | Y | Y | (वर्षे) | M | M | (महिने) | D | D | (दिवस)

८. महाराष्ट्र शासनाच्या पोलीस विभागामध्ये शासन परिपत्रकात नमूद केलेल्या दिनांकापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील :-

| अ.क्र. | पदाचे नाव | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस शिपाई | | | |
| २ | पोलीस नाईक | | | |
| ३ | पोलीस हवालदार | | | |
| ४ | सहायक पोलीस उपनिरीक्षक | | | |

९. सामाजिक वर्गवारीचा तपशील :-

९.१ वर्गवारी :- | अमागास | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. |

९.२ जातीच्या प्रमाणपत्राचे पडताळणी झाली आहे काय ? | होय | नाही |

९.३ नसल्यास जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी प्रलंबित असल्याची कारणे :- ____________________

१०. सेवा तपशील :-

१०.१ उमेदवाराविरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित/प्रस्तावित आहे काय? | होय | नाही |

१०.२ विभागीय चौकशी प्रलंबित /प्रस्तावित असल्यास त्याची संक्षिप्त माहिती :- ____________________

१०.३ उमेदवाराविरुद्ध फौजदारी खटला होऊन शिक्षा झाली आहे काय? | होय | नाही |

१०.४ फौजदारी खटला प्रलंबित आहे काय? | होय | नाही |

१०.५ फौजदारी खटला होऊन शिक्षा झाली असल्यास / खटला प्रलंबित असल्यास त्याबाबतचा तपशील :-
____________________

१०.६ संबंधित विभागाच्या सेवेत असताना झालेल्या शिक्षेचा तपशील :-
____________________

१०.७ उमेदवाराचा गोपनीय अभिलेख समाधानकारक आहे काय ? | होय | नाही |

१०.८ तो/ती पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती देण्यास पात्र आहे काय ? | होय | नाही |

१०.९ विशिष्ट कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात आले आहे काय ? | होय | नाही |

१०.१० आगाऊ वेतनवाढ मिळाली आहे काय ? | होय | नाही |

१०.११ विहीत संगणक प्रशिक्षण पूर्ण केले आहे काय ? | होय | नाही |

११...

**११.** अतिरिक्त माहिती :-

११.१ पोलीस सेवेत मिळालेली पदके, सन्मानचिन्हे, बक्षिसे, प्रशस्तीपत्रके यांचा तपशील (Number of Cash Rewards and Number of G.T.S.)

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

११.२ पोलीस सेवेत असताना घेतलेले प्रशिक्षण व त्याबाबतचा तपशील :-

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | स्थळ | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

**१२.** पोलीस उपनिरीक्षक (सेवाप्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम, २००८ नुसार संधी देण्यात आलेल्या उमेदवारांपैकी असल्यास, यापूर्वीच्या परीक्षांचा तपशील :-

१२.१ परीक्षेचे वर्ष : | | | | | बैठक क्रमांक : | | | | | | | | |

१२.२ परीक्षेचे वर्ष : | | | | | बैठक क्रमांक : | | | | | | | | |

१२.३ परीक्षेचे वर्ष : | | | | | बैठक क्रमांक : | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, सदर उमेदवार सेवा प्रवेश नियमानुसार व संबंधित शासन परिपत्रकानुसार सर्व अटींची पूर्तता करीता असून प्रस्तुत परीक्षेस पात्र आहे. वरील नोंदी संबंधित कागदपत्रावरुन व मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्यात आल्या आहेत.

दिनांक :-

आस्थापना अधिकारी किंवा कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख
यांची सही व हुद्दयाच्या शिक्का

ठिकाण :-